# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**"गायमुख पन्हेळी" (ता.तळा, जि.रायगड) या पर्यटन घोषित स्थळास सोईसुविधासाठी निधी देण्याबाबत**

**(१) ७११२० (२७-०१-२०१७) श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) " गायमुख पन्हेळी " ता.तळा जि.रायगड या पर्यटन घोषित स्थळास आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायमुख पन्हेळी पर्यटन स्थळास आवश्यक निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-१२-२०१८) :**(१) नाही.

(२) व (३) "गायमुख पन्हेळी", ता.तळा, जि.रायगड या पर्यटन स्थळास आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडून (दिनांक ३/१०/२०१८) च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावामध्ये गायमुख पन्हेळी येथे संरक्षक भिंत बांधणे, परिसर सुधारणा करणे, शेड बांधणे, शौचालय बांधणे इत्यादी सुविधा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. सदर प्रस्तावाबाबत प्रादेशिक पर्यटन विकास योजनेनुसार कार्यवाही सुरु आहे.

---

**कोयनानगर (ता.पाटण,जि.सातारा) या पर्यटन स्थळास विकासाकरिता निधी मिळण्याबाबत**

**(२) ७४९६७ (१४-०४-२०१७) श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने दिनांक ०४ जानेवारी, २०१७ रोजीच्या पर्यटन विभागाच्या बैठकीमध्ये सन २०१७-१८ हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे करण्याबाबत शासनाने निश्चित केले असून राज्यातील विविध पर्यटन क्षेत्राची माहिती संकलित करण्याचे शासनाचे काम सध्या सुरु असून अशाप्रकारची माहिती संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत एकत्रित केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कोयना धरण व कोयनानगर येथील सर्व परिसर तसेच सुमारे १० किलोमीटरचा परिसर हा पाटण तालुक्यात असून कोयनानगर पर्यटन स्थळाचा व परिसराचा प्रादेशिक पर्यटन विकासामध्ये समावेश करावा अशी मागणी सातारा जिल्हाधिकारी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार कोयनानगर हे पर्यटन स्थळ प्रादेशिक पर्यटन विकासाच्या दृष्टीने विकसित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-१२-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रादेशिक पर्यटन विकास समितीच्या दिनांक ४.१.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील प्रत्येक जिल्हयातील पाच सर्वसमावेशक पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये कोयनानगर परिसर/ धबधबा या पर्यटन स्थळाचा समावेश आहे. त्याशिवाय सातारा जिल्हयाच्या पर्यटन विकास बृहद् आराखड्यातही सदर स्थळाचा समावेश करण्यात आलेला आहे.

---

**उजव्या व डाव्या कालव्याच्या दुरुस्तीच्या कामात अधिकारी व गुत्तेदारानी केलेला गैरव्यवहार**

**(३) ८२०९३ (१८-०४-२०१७) डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सव्वा दोन कोटी रुपये खर्चून दुरुस्त केलेल्या कुंद्राला प्रकल्पाचा कालवा (ता. मुखेड) फुटल्याने उपविभागीय अभियंता यांच्याकडून पाहणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजव्या व डाव्या कालव्याच्या दुरुस्तीच्या नावाखाली सव्वा दोन कोटी घेवून अंत्यत निकृष्ट दर्जाचे दुरुस्तीचे काम करण्यात आले, त्यामुळे पहिल्या पावसाच्या पाण्यातच प्रकल्पाचा उजवा कालवा फुटून करोडो लीटर पाणी वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उजव्या व डाव्या कालव्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या तत्कालीन अभियंता व गुत्तेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१८) :** (१) होय

(२) निकृष्ट दर्जाच्या दुरूस्ती कामामुळे उजवा कालवा फुटला हे खरे नाही. तथापि, जानेवारी २०१७ मध्ये कुंद्राळा धरणाच्या डाव्या कालव्यावरील साखळी ६८० मी.वरील जलसेतुच्या नलिकेमध्ये वरच्या बाजूस गाळ कचरा अडकल्याने कालव्याच्या पाणी पातळीत वाढ होवून जलसेतूच्या वरच्या बाजूस निरीक्षण पथाच्या बाजूने २ ते ३ मी. लांबीचा भराव फुटला होता. कालव्याचे मुख्य द्वार बंद करेपर्यंतच्या दीड तासाच्या कालावधीत काही प्रमाणात पाणी वाया गेले. कालव्याची आवश्यक दुरुस्ती तातडीने करुन कालवा सुस्थितीत आणून विसर्ग प्रवाहीत करण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अप्पर पैनगंगा प्रकल्पाचे (इसापूर धरण) (ता.पुसद,जि.यवतमाळ) पाणी यवतमाळ जिल्हयातील सिंचन क्षेत्राला देण्याबाबत

**(४) १०२११५ (०२-०१-२०१८) श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर पैनगंगा प्रकल्पाचे (इसापूर धरण) (ता.पुसद,जि.यवतमाळ) पाणी यवतमाळ जिल्हयातील सिंचन क्षेत्राला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना माहे जुलै,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २२.०३.२०१७ च्या पत्रान्वये उमरखेड, हदगांव व हिमायतनगर विदर्भ मराठवाडा सिमेवरून वाहणारी पैनगंगा नदी पात्रात बारमाही पाणी सोडणेबाबत मागणी केली आहे.

(२) पैनगंगा ही बारमाही नदी नाही तसेच धरणातून नदीमधे पाणी सोडण्याची तरतूद प्रकल्प अहवालात नाही.

कालवा सल्लागार समितीच्या निर्देशानुसार इसापूर डाव्या कालव्यामध्ये सन २०१६-१७ चे रब्बी हंगामात तीन व उन्हाळी हंगामात दोन पाणीपाळया सोडण्यात आल्या. जिल्हाधिकारी, यवतमाळ व नांदेड यांच्या आदेशानुसार पैनगंगा नदीमध्ये पिण्यासाठी माहे मार्च, एप्रिल व मे २०१७ मध्ये यवतमाळसाठी १२ दलघमी व नांदेडसाठी ११ दलघमी पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५) १०२१३२ (०२-०१-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याची दुरवस्था झाल्याने पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पाटबंधारे विभागाचे कालव्याच्या साफसफाई व डागडूजीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे जलाशयातून सोडण्यात येणारे पाणी शेवटपर्यंत पोहचत नसल्याने शेतक-यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डाव्या कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार जायकवाडीच्या डाव्या कालव्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-१२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

कालव्याची देखभाल व दुरुस्तीची कामे (गाळ काढणे, भरावकाम, झाडेझुडपे काढणे) प्रामुख्याने यांत्रिकी विभागाचे यंत्रसामुग्रीमार्फत करण्यात येत आहेत. डाव्या कालव्याची एकूण लांबी २०८ कि.मी. असुन मुख्य कालव्यावरील शेवटची शाखा कालवा ७० वरील मायनर २९ पर्यंत पाणी पोहचले असुन सिंचन करण्यात आले आहे. तसेच कालव्याचे मोठया प्रमाणातील दुरुस्तीसाठी केंद्र शासनाचे ISBIG योजनेंतर्गत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालखेड (जि.नाशिक) धरण समूहातील लाभधारक शेतकरी व पाणीवापर संस्थांच्या मागणीप्रमाणे आवर्तनांचा निर्णय न झाल्याने लाभक्षेत्रातील पिक नियोजन धोक्यात आल्याबाबत**

**(६) १०५७४० (०७-०४-२०१८) श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड (जि.नाशिक) धरण समूहातील लाभधारक शेतकरी व पाणीवापर संस्थांच्या मागणीप्रमाणे आवर्तनांचा निर्णय न झाल्यामुळे लाभक्षेत्रातील पाणीवापर संस्थांनी पाणीवाटपावर बहिष्कार टाकल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,लाभक्षेत्रातील पिक नियोजन धोक्यात आल्याने पालखेड डावा कालव्यातील वहन व्ययाबाबत विभागाने फेरतपासणी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदूरमध्यमेश्वर जलद कालव्यामुळे पालखेड लाभक्षेत्रातील कपात झालेल्या क्षेत्रामुळे शिल्लक राहणाऱ्या ३१०.५७ दलघफु पाण्यातून वितरीका क्र. ४६ ते ५२ हा खरीप कालवा आठमाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचेकडे मागणी केलेली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१८) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
श्री. संतु पा. झांबरे, अध्यक्ष, बळीराज्य पाणी वापर सहकारी संस्थांचा संघ लि., येवला यांनी दि.४/१२/२०१७ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) जलसंपदा विभागातंर्गत चारी क्र. ३३, ३४, ३५ वरील ज्या पाणी वापर संस्थाच्या पदाधिका-यांनी राजीनामे दिले, त्या पाणीवापर संस्थेच्या लाभधारकांना शासनामार्फत पाणी देण्यात आलेले आहे.

नांदुर मधमेश्वर कालव्यामुळे कपात झालेल्या २९३० हे. क्षेत्रामुळे ३१०.५७ द.ल.घ.फु. पाणी बचत झाल्याचे नमुद केलेले असले तरी सद्यस्थितित बिगरसिंचनाचे आरक्षणामध्ये लक्षणीय वाढ झाल्याने सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध होते. त्या पाण्यामधुन प्रकल्पिय नियोजननुसार निर्धारीत क्षेत्रास पाणी देणे शक्य होत नाही. त्यामुळे पाण्याची उपलब्धता व पालखेड डावा कालवा कि. मी. ११० ते १३० व चारी क्र. ४६ ते ५२ करीता रब्बी हंगामासाठी तरतुद नसल्याने व उर्ध्व गोदावरी खोरे हे तुटीचे खोरे असल्याने हा खरीप कालवा आठमाही करणे संयुक्तिक होणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पायाभूत प्रकल्पांमुळे महसुलात घट होत असल्याबाबत

**(७) १०६३११ (२८-०३-२०१८) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध पायाभूत प्रकल्पांसाठी सुमारे ३ लक्ष ५० हजार कोटींचे कर्ज घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम सात लाख कोटी इतकी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्जाच्या परतफेडीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-११-२०१८) :** (१) सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाअखेर राज्याचे एकूण दायित्व रु.३,६४,८१९ कोटी व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाअखेर सुधारीत अंदाजानुसार राज्याचे एकूण दायित्व रु. ४,०६,८११ कोटी एवढे अपेक्षित आहे.

(२) राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम सात लाख कोटी इतकी झाली आहे, ही बाब खरी नाही, कारण सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाअखेर अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याचे एकूण रु. ४,६१,८०७ कोटी एवढे अपेक्षित आहे.

केंद्राने निश्चित केलेल्या मर्यादेनुसार राज्य शासनाला स्थूल उत्पन्नाच्या ३% मर्यादेत वार्षिक कर्ज उभारणी करता येते. राज्य शासनाच्या एकूण कर्जाचे, राज्य स्थुल उत्पन्नशी प्रमाण २५% च्या आत ठेवणे आवश्यक आहे. सन २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यानुसार राज्यावरील प्रत्यक्ष संचित दायित्वाचे राज्य स्थुल उत्पन्नाशी प्रमाणे १६.१६% आहे. सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्येही मर्यादेचे उल्लघंन होणार नाही याबाबत वित्तीय शिस्तीचे धोरण ठरविले आहे.

(३) व (४) राज्याच्या कर व करेतर महसूलाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नात सातत्याने वाढ होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेतह. जीएसटी अंतर्गत समाविष्ट झालेल्या करांचा विचार गतवर्षीच्या तुलनेत १२% वृध्दी दिसून आली आहे.

अत्यावश्यक सेवा, डॉक्टर्स, पॅरामेडीकल स्टाफ, आर्थिकदृष्ट्या सक्षम स्वायत्त संस्था तसेच ज्या विभागांच्या पदनिर्मितीमुळे राज्याच्या महसूलात वाढ होणार आहे असे प्रस्ताव वगळता “वेतनावरील खर्च नियंत्रित करणे” या विषयाच्या वित्त विभागाच्या दिनांक ०२-०६-२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयातील नवीन पदनिर्मिती / पदभरती निर्बंध घालण्यात आले आहेत.

वित्त विभागाने दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत होणाऱ्या अनावश्यक खरेदीवर निर्बंध लावून अनावश्यक खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विभागाकडील अखर्चित निधी हा घाईघाईने वर्षाअखेरिस संपविण्याच्या वृत्तीवरील निर्बंध लावून आर्थिक शिस्त राखण्याचा प्रयत्न केला आहे.

---

## अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात पाणी टंचाई दूर करण्यासाठी हिळ्ळी बंधा-यापर्यंत उजनी प्रकल्पाचे पाणी सोडण्याचा घेतलेला निर्णय

**(८) १०६४३७ (०७-०४-२०१८) श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात गेल्यावर्षी झालेल्या कमी पावसामुळे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्येच तालुक्यातील चिंचपूर ते हिळ्ळी बंदा-यापर्यंत असलेले भिमानदीचे पात्र कोरडे पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी टंचाईमुळे अक्कलकोट तालुक्यातील रब्बी पिकांचे व ऊसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तालुक्यात असलेल्या गावातील ग्रामस्थांना व अक्कलकोट येथील स्वामी समर्थ देवस्थानाला भेट देण्यासाठी येणा-या भाविक आणि पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने भिमा नदीच्या पात्रात खड्डे खोदण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी हिळ्ळी बंदा-यापर्यंत उजनी प्रकल्पाचे पाणी सोडण्याचा निर्णय जिल्ह्याच्या मा.पालकमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेऊनही अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) नाही.

भीमा नदीवरील चिंचपूर को.प.बंधा-यामध्ये फेब्रुवारी २०१८ अखेर पर्यंत व हिळ्ळी को.प.बंधा-यामध्ये मार्च २०१८ अखेरपर्यंत पाणी उपलब्ध होते. या कालावधीमध्ये भिमा नदीचे पात्र कोरडे पडले नाही.

(२) नाही.

(३) नाही.

सद्य:स्थितीत बोरी मध्यम प्रकल्पातून अक्कलकोट शहर पाणीपुरवठा योजना अवलंबून आहे. बोरी मध्यम प्रकल्पामध्ये यावर्षी पूर्ण क्षमतेने पाणीसाठा झाल्यामुळे अक्कलकोट शहरासाठी पाणी टंचाई निर्माण झालेली नाही.

भीमा नदीवरील चिंचपूर को.प. बंधा-यामध्ये फेब्रुवारी २०१८ अखेर पर्यंत व हिळ्ळी को.प.बंधा-यामध्ये मार्च २०१८ अखेरपर्यंत पाणी उपलब्ध होते. त्यामुळे नदी काठच्या गावांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली नाही.

(४) अंशत: खरे आहे.

दि.०५/१२/२०१७ रोजी मा.पालकमंत्री, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सोलापूर जिल्हयाचे पिण्याच्या पाण्याचे आरक्षण समितीच्या बैठकीत उजनी धरणातून सोलापूर शहरासाठी व भीमा नदीवरील इतर पाणी पुरवठा योजनांसाठी २० टीएमसी पाण्याचे आकस्मिक आरक्षण करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उजनी धरणातून भीमा नदीद्वारे सोडावयाचे पाणी (आरक्षणाच्या मर्यादेत) संभाव्य परिस्थितीनुसार ३ ते ४ वेळा सोडावे पैकी दुस-या वेळी सोडलेले पाणी हिळळी बंधा-यापर्यंत सोडण्यात यावे असा निर्णय झाला होता.

त्यानंतर उजनी प्रकल्पाच्या उन्हाळी हंगामाचे कालवा सल्लागार समितीच्या दि.०८/०३/२०१८ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दि.२४/०३/२०१८ ते दि.०५/०४/२०१८ या कालावधीत उजनी धरणातून सोडणेत आलेले पाणी हिळ्ळी को.प.बंधारा पर्यंत पोहोचले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आजरा तालुक्यातील उचंगी प्रकल्प (जि.कोल्हापूर) येथील तार ओहोळ नाल्यावरील घळभरणी व सांडव्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(९) १०७१५३ (२८-०३-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उचंगी प्रकल्प (ता.आजरा,जि.कोल्हापूर) येथील तार ओहोळ नाल्यावरील घळभरणी व सांडव्याचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने उंचगी गावाचे पुनर्वसन अन्यत्र करण्याविषयी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.जलसंपदा मंत्री व सर्व संबंधित अधिकाऱ्यांची मंत्रालयात बैठक होऊन सदर काम दिनांक १ नोव्हेंबर,२०१७ रोजी पासून सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाल्यावरील घळभरणी व सांडव्याचे काम प्रत्यक्षात सुरु झाले आहे काय व सदर कामासाठी किती खर्च अपेक्षित आहे,

(३) तसेच या प्रकल्पामुळे किती कुटुंबाचे पुनर्वसन करावे लागणार आहे व ते कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे,

(४) असल्यास,पुनर्वसितांचे पुनर्वसन तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.मंत्री,महसूल,सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून),मदत व पुनर्वसन यांचे अध्यक्षतेखाली दि. ०८/०८/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये उचंगी प्रकल्पांतर्गत प्रलंबित भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही लवकर पूर्ण करून प्रकल्पाचे काम सुरू करण्याचे निर्देश दिलेले आहेत.या प्रकल्पातील उचंगी गावाचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नसून फक्त प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करणेची आहे.

(२) पुनर्वसनाअभावि प्रकल्पग्रस्तांचा बांधकामास तीव्र विरोध असलेमुळे सदर कामास सुरूवात करता आलेली नाही. घळभरणी,सांडवा व विमोचकाचे उर्वरित कामासाठी अंदाजे रु.११.७७ कोटी खर्च अपेक्षित आहे.

(३) उचंगी प्रकल्पात गावठाण बाधीत होत नाही. उचंगी प्रकल्पातील एकूण प्रकल्पग्रस्तांची संख्या २८० एवढी असून ६५ टक्के रक्कम भरलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या १८४ असून त्यांना देय क्षेत्र ११२.७० हे.आर. एवढे आहे. सदर प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पर्यायी जमीनीचे वाटप करण्यात येत आहे. आत्तापर्यंत ११३ प्रकल्पग्रस्तांना ६१ हे.आर. जमीन वाटप करण्यात आलेली आहे. उचंगी प्रकल्पासाठी कोळींद्रे ता.आजरा येथे पुनर्वसन गावठाण करण्यात आले आहे.

(४) उचंगी प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपासाठी आवश्यक क्षेत्र उपलब्ध नसल्याने चित्री प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील २७.३६ हे.आर. क्षेत्र उचंगी प्रकल्पग्रस्तांना वाटप करणेसाठी शासनाने दि. २७ जुलै २०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मौजे चितळे व जेवूर येथील २३.६५ हे.आर. इतकी गायरान जमीन उचंगी प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन म्हणून वाटप करणेस मान्यता मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणेत आला आहे.
(५) उचंगी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मौजे वाटंगी येथील श्री.शंकराचार्य सदगुरू मठ यांच्या जमीनीच्या भूसंपादनाबाबत संबंधित कुळांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असून सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असून सदरच्या याचिका न्यायप्रविष्ठ आहेत.

---

**बेंबळा प्रकल्पांतर्गत धामक (ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती) गावाचे पूर्णत: पूनर्वसन करणेबाबत**

**(१०) १०८७३९ (१३-०४-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा प्रकल्पांतर्गत धामक (ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती) गावाचे पूर्णत: पूनर्वसनासंबंधी बैठक घेवून निर्णय घेणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूर्णत: पूर्नवसन करण्याच्या घोषणेमुळे पूर्वीचे अशंत: पूनर्वसनाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर गावाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८) : (१)** होय.
(२) नाही. धरणस्थळा पर्यंतच्या सुधारित जलनिष्पत्तीविषयक अभ्यासानुसार धरणाच्या पूर्ण संचय पातळीत बदल होण्याची शक्यता निर्माण झाल्याने व त्यामुळे जलमग्न क्षेत्राच्या व्याप्तीत बदल होत असल्याने याबाबतच्या अंतिम निर्णयासाठी अंशतः पुनर्वसनाचे काम प्रलंबित होते.
(३) मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांनी केलेल्या अभ्यासानुसार येवा निश्चित करण्यात आला आहे व त्यानुसार धरणाची पूर्ण संचय पातळी तलांक २६८.०० मी इतकी ठेवण्यात आली आहे. त्यानुसार पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे धामक गावाच्या पुनर्वसनाबाबत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हनुमान हिपरगा (ता.देगलुर, जि. नांदेड) येथील जून्या कोल्हापूरी बंधाराचे उच्च पातळी बंधारामध्ये रुपांतरीत करणेबाबत**

**(११) १०८८५६ (१३-०४-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हनुमान हिपरगा (ता.देगलुर, जि. नांदेड) येथील जुन्या कोल्हापूरी बंधाराचे आधुनिकीकरण करुन उच्च पातळी बंधारामध्ये रुपांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव लघुसिंचन (जलसंधारण) विभागाकडून शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार जुन्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे आधुनिकीकरण करुन उच्च पातळी बंधारामध्ये रुपांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही, मौजे हनुमान हिपरगा (ता.देगलूर,जि.नांदेड) येथील जुन्या कोल्हापूरी बंधा-याचे आधुनिकीकरण करुन उच्च पातळी बंधा-यामध्ये रुपांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ला परिसरातील विकास आराखडा तयार करण्यात आला नसल्याबाबत**

**(१२) ११००९६ (०५-०४-२०१८) श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ला देखभालीसाठी लष्कराकडून शासनाकडे हस्तांतरीत होऊन देखील अद्यापपर्यंत तेथील सुशोभीकरणाचा विकास आराखडा तयार करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-११-२०१८) : (**१) नाही.
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक- बैठक २०१८/३/प्र.क्र. १९१/पर्यटन, दिनांक ३१.३.२०१८ अन्वये अहमदनगर येथील भुईकोट किल्ल्याच्या विकास कामांसाठी रुपये ४९३.४० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रुपये ५०.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर रुपये ५०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्यामार्फत संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेस वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हंड्याकुंड्या लघु पाटबंधारे प्रकल्प (ता.चोपडा,जि.जळगाव) या प्रस्तावित प्रकल्पाच्या कामास लागणा-या वन जमिनीच्या हरकतीमुळे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) १११९११ (११-०४-२०१८) श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंड्याकुंड्या लघु पाटबंधारे प्रकल्प (ता.चोपडा,जि.जळगाव) या प्रस्तावित प्रकल्पास सन १९९८ मध्ये ३.५१ कोटीची मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्पाच्या कामास लागणा-या ३१.४९ हे.आर. वन जमिनीच्या हरकतीमुळे काम अद्याप सुरु करता आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये १.९१ दक्षलक्ष घनमीटर पाणीसाठी निर्माण होणार असून २६४ हेक्टर जमीनीवर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे परंतू त्यासाठी २.४० कोटी वन विभागाकडे एनपीव्ही करीता सादर करावे लागणार आहेत तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राची पुर्ण संचय पातळी मार्कींग करण्यासाठी ०.०३ कोटी रुपये रक्कम आवश्यक असल्याने सन २०१७-१८ च्या पुरवणी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी अशी मागणी करणारे पत्र दिनांक १९ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८)** :(१) होय.

(२) होय.

(३) हंड्याकुंड्या बांधकामाधीन ल.पा. योजनेसाठी सन २०१८-१९ च्या महामंडळाच्या वार्षिक आखणीत रु.०.००१ कोटी इतकी लाक्षणिक तरतूद आहे. सदर योजनेसाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी सादर केला आहे. त्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## तेर (जि.उस्मानाबाद) येथील कै. रामलिंग अप्पा लामतुरे वस्तु संग्रहालय येथे पर्यटक निवास बांधकाम करण्याबाबत

**(१४) ११२७७४ (१०-०४-२०१८) श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेर (जि.उस्मानाबाद) हे गांव पर्यटन विभागाकडून 'ब' वर्ग दर्जा प्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेर (जि.उस्मानाबाद) येथे कै. रामलींग अप्पा लामतुरे वस्तु संग्रहालय येथे पर्यटक निवास बांधकाम करण्यासाठी वाढीव निधीचा प्रस्ताव जा.क्र. २०१७/मिनिस/का-२/पर्यटन/१०९/दिनांक १६ जानेवारी,२०१८ रोजी अवर सचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य, मंत्रालय , मुंबई येथे दाखल झालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयकुमार रावल (२२-११-२०१८) :** (१) नाही. तथापि, श्री संत गोरोबा काका मंदिर, तेर, जि.उस्मानाबाद या तिर्थक्षेत्रास जिल्हा नियोजन समितीने दिनांक २९.८.१९९८ रोजी "क" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा दिला असून प्रधान सचिव, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीने दिनांक २६.१२.२०१३ रोजी "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिलेला आहे.

(२), (३) व (४) होय. प्रस्तुत प्रस्तावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**धारगाव (जि. भंडारा) येथील धारगाव उपसासिंचन योजना टप्पा १ गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्याबाबत**

**(१५) ११३५३४ (११-०४-२०१८) श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारगाव (जि. भंडारा) येथील धारगाव उपसासिंचन योजना टप्पा १ व २ या दोन्ही योजना गोसेखुर्द प्रकल्पाच्या जलाशयावर प्रस्तावित आहेत तसेच धारगाव उपसा सिंचन योजना हि उस्रागोंदी गावाजवळ प्रस्तावित असून यामुळे भंडारा व लाखनी तालुक्यातील २२ गावातील ऐकून ३२ हजार हे. आर. शेतजमीन सिंचनाखाली येऊ शकते तर टप्पा २ योजनेमुळे भंडारा लाखनी व साकोली तालुक्यातील ४९ गावातील ८५०० हे. आर. क्षेत्र सिंचना खाली येऊ शकते त्यामुळे टप्पा १ हि योजना गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करणेबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक २६ जुलै,२०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच त्यानुसार कार्यकारी अभियंता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी धारगाव उपसासिंचन टप्पा १ ही योजना गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१७ वा त्या सुमारास तसेच त्यापूर्वी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांच्याकडे सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टप्पा १ ही योजना गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील ताकारी उपसा सिंचन योजनेचे रब्बी हंगामातील आवर्तनाबाबत**

**(१६) ११४७७८ (१२-०४-२०१८) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील ताकारी उपसा सिंचन योजनेचे रब्बी हंगामातील पहिले आवर्तन दोन महिन्यापासून थकित राहिल्याने येथील लाभक्षेत्रातील शेतक-यांची पिके वाळून गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर योजनेचे रब्बी हंगामातील आवर्तन तात्काळ सोडविण्यासह शेतक-यांना पिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने नव्याने होत असलेल्या विकासकामांच्या आर्थिक नियोजन व वित्तीय खर्चाचे नियोजन करण्याबाबत**

**(१७) ११५४३७ (०४-०४-२०१८) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यावर सध्या ४ लाख १५ हजार कोटीचे कर्ज असून त्यात आणखी दिड लाख कोटी रूपयांचे कर्ज जपानकडून घेण्यात येणार असल्याने कर्जाचा आणखी बोजा वाढणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने होत असलेल्या विकासकामांच्या आर्थिक नियोजन व वित्तीय खर्चाचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-११-२०१८) :** (१) सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाअखेर रज्ञज्याचे एकूण दायित्व रु.३,६४,८१९ कोटी व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाअखेर सुधारीत अंदाजानुसार राज्याचे एकूण दायित्व रु.४,०६,८११ कोटी एवढे अपेक्षित आहे. तसेच सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाअखेर अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याचे एकूण दायित्व रु. ४,६१,८०७ कोटी एवढे अपेक्षित आहे.

(२) राज्याला मिळणाऱ्या कर व करेत्तर महसूलाच्या माध्यमातून तसेच खुल्या बाजारातून उभारण्यात येणाऱ्या कर्जातून विकासकामे करण्यात येत आहेत. तेच राज्याच्या महसूलात वाढ होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जीएसटी अंतर्गत समाविष्ट झालेल्या करांचा विचार करता गतवर्षीच्या तुलनेत १२% वृध्दी दिसून आली आहे.

त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवा, डॉक्टर्स, पॅरामेडीकल स्टाफ, आर्थिकदृष्ट्या सक्षम स्वायत्त संस्था तसेच ज्या विभागांच्या पदनिर्मितीमुळे राज्याच्या महसूलात वाढ होणार आहे असे प्रस्ताव वगळता “वेतनावरील खर्च नियंत्रित करणे” या विषयाच्या वित्त विभागाच्या दिनांक २-६-२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयातील नवीन पदनिर्मिती / पदभरती निर्बंध घालण्यात आले आहेत.

वित्त विभागाने दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत होणाऱ्या अनावश्यक खरेदीवर निर्बंध लावून अनावश्यक खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विभागाकडील अखर्चित निधी हा घाईघाईने वर्षाअखेरिस संपविण्याच्या वृत्तीवरील निर्बंध लावून आर्थिक शिस्त राखण्याचा प्रयत्न केला आहे.

मेट्रो, ट्रान्स हार्बर लिंक , कोस्अल रोड इत्यादी प्रकल्प हे मंबई महानगर विकास प्राधिकरण यांच्या मार्फत राबविले जाणार असून, कर्जाची उभारणी प्राधिकरणाकडून केली जाणार आहे व सदर कर्जाची परतफेड प्राधिकरणाच्या उत्पन्नातून केली जाणार आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकल्पांच्या खर्चाच्या भार राज्याच्या अर्थसंकल्पावर येणार नाही.

(३) लागू नाही.

---

## महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील दमणगंगा नदीजोड प्रकल्पातंर्गत एकदरे धरण प्रकल्पातुन गुजरातला पाणी न देण्याबाबत

**(१८) ११७०६१ (२४-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील दमणगंगा नदीजोड प्रकल्पातंर्गत एकदरे धरण प्रकल्पातुन गुजरातला पाणी देऊ नये तसेच इतर मागण्यांसाठी दिनांक २३ एप्रिल,२०१८ रोजी नाशिक जिल्हयातील पेठ तहसील कार्यालयावर परिसरातील आदिवासी नागरीकांनी मोर्चा काढून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,एकदरे धरण प्रकल्पातुन गुजरातला पाणी न देण्यासह इतर मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) दमणगंगा (एकदरे)- गोदावरी या राज्यांतर्गत नदीजोड योजनेचे सर्वेक्षण,अन्वेषण आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) ही केंद्रीय संस्था करीत असून सदर धरणाच्या नियोजनातून गुजरात राज्यास कुठल्याही प्रकारे पाणी देण्याचे नियोजन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणेगाव - दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालव्याचे पूर्ण लांबीतील अस्तरीकरण करण्यासह जोड उपसा योजना क्र. ३ चे पाणी पुणेगाव धरणात वळविण्याबाबत

**(१९) ११७५५२ (२०-०७-२०१८) श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी (जि.नाशिक) प्रकल्पामधील पुणेगाव - दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालव्याचे पूर्ण लांबीतील अस्तरीकरणाबाबत दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कडवा कालवा विभागाने दिनांक १५ मे, २०१८ रोजी सदर पोहोच कालव्याच्या अस्तरीकरणासाठी शासनास प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक जिल्ह्यातील जोड उपसा योजना क्र. ३ चे पाणी पुणेगाव धरणात वळविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेल्या मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर तांत्रिक अभ्यास करण्याचे काम पूर्ण झाले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,चांदवड व येवला इ. अवर्षणग्रस्त तालुक्यांची गरज लक्षात घेवून पुणेगाव - दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालव्याचे पूर्ण लांबीतील अस्तरीकरण करण्यासह जोड उपसा योजना क्र. ३ चे पाणी पुणेगाव धरणात वळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) :** (१) मा.श्री. जयवंतराव जाधव,विधान परिषद सदस्य यांनी दिनांक २२/०९/२०१७ व मा.श्री.छगन भुजबळ, विधानसभा सदस्य यांनी दिनांक १६/१०/२०१७ च्या पत्रान्वये जोड उपसा योजना क्र.३ चे पाणी पुणेगांव (जि.नाशिक) धरणात वळविण्याबाबत व पुणेगांव-दरसवाडी-डोंगरगांव पोहोच कालवा प्रवाहीत होणेसाठी कालव्याची विशेष दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

कालव्याच्या संपूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा अभ्यास म. सं. सं., नाशिक यांच्या मार्फत करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(२) मा.श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दि.११-०९-२०१७ च्या पत्रान्वये अस्तरीकरणाची मागणी केली आहे.

पुणेगाव डाव्या कालव्याच्या पूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा समावेश उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावित नाही. त्यामुळे कालव्याच्या संपूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा अभ्यास म. सं. स., नाशिक यांच्या मार्फत करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) पुणेगांव-दरसवाडी-डोंगरगांव पोहच कालव्याच्या पूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा समावेश उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात नाही.

कालव्याच्या संपूर्ण लांबीतील अस्तरीकरणाबाबत क्षेत्रीय स्तरावर अभ्यास करण्यात येत आहे.

पार खो-यातून गोदावरी खो-यात पाणी वळविणा-या उपसा जोड योजना क्र.३ चे सविस्तर सर्वेक्षण, अन्वेषण व प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात अनेक लहान, मध्यम व मोठी धरणात गाळ साचल्याने धरणाची साठवण क्षमता कमी झाल्याबाबत**

**(२०) ११८९८४ (२०-०७-२०१८) श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक लहान, मध्यम व मोठी धरणे आहेत सिंचनक्षमतेच्या दृष्टीने धरण बांधतांना संकल्पित आराखडा तयार करण्यात येतो परंतू कालातंराने धरणात गाळ साचत गेल्यास धरणाची साठवण क्षमता कमी होऊन धरणाचे पाणी तळाला गेल्याचे दिसून येते त्याचा परिणाम राज्यातीत सिंचनावर होत असल्याचे दिनांक 21 एप्रिल, 2018 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार धरणांतील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

धरणाचा आराखडा तयार करतांना पाणलोट क्षेत्रातून येणा-या संभाव्य गाळाचे अनुषंगाने मृत व जिवंत साठ्यात तरतूद करण्यात येत असल्याने तरतुदीनुसार गाळ जमा झाल्यास सिंचनावर परिणाम होत नाही.

मेरी नाशिक या संस्थेद्वारे ४८ जलाशयांचे गाळ सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. गाळ सर्वेक्षणच्या अभ्यासावरून सदर प्रकल्पात ८.५८ टक्के उपयुक्त साठ्यात घट झाली आहे.

(२) जलसंपदा विभागाचे शासन निर्णय क्र. मेरीना-२०१८/प्र.क्र. १३७/१८ लाक्षेवि (आस्था) मंत्रालय मुंबई दि. ०३.०८.२०१८ नुसार राज्यातील सर्वच प्रकल्पांवर गाळ व गाळमिश्रित वाळू / रेती निष्कासनाचे धोरण न राबवता मेरी नाशिकद्वारे निवडण्यात आलेल्या १) उजनी प्रकल्प- जि. सोलापूर,२) गिरणा प्रकल्प- जि. नाशिक, ३) गोसिखुर्द प्रकल्प- जि. भंडारा,४) जायकवाडी प्रकल्प- जि. औरंगाबाद व ५) मुळा प्रकल्प- जि. अहमदनगर या पाच मोठ्या प्रकल्पातील गाळ व गाळ मिश्रित वाळू/रेती निष्कासन करावे. तदनंतर या प्रक्रीयेचा अनुभव घेऊन राज्यातील उर्वरीत प्रकल्पातील गाळ मिश्रित वाळू /रेती निष्कासनाबाबतचे धोरण शासन सुधारीत करेल.

उपरोक्त निवड करण्यात आलेल्या पाचही प्रकल्पावर एकाचवेळी प्रकल्पनिहाय ई-निविदा राबविण्यात येणार असून ई निविदेची कार्यपध्दती, कंत्राटाच्या अटी व शर्ती शासन मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळ निश्चित करेल. त्याकरीता शासन परिपत्रक दि. ६.८.२०१८ द्वारे समिती गठीत करण्यात आली आहे.

त्याच प्रमाणे शासनाद्वारे जलयुक्त शिवार योजने अंतर्गत लघु प्रकल्पाचे जलाशयातील गाळ काढण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेंबळा प्रकल्पातंर्गत घुईखेड (ता. चांदुर रेल्वे,जि.अमरावती) हे पूनर्वसीत मूलभुत सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(२१) ११९०७३ (२०-०७-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा प्रकल्पातंर्गत पूर्नवसीत घुईख़ेड (ता.चांदुर रेल्वे,जि.अमरावती) या गावाचे पूर्नवसन ११ वर्षापूर्वी झाले असून अद्यापही गावात पूर्णपणे मूलभुत सोयीसुविधा पुरवण्यात आल्या नसल्याचे दिनांक १५ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ओंकारखेडा (ता. नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती) या बेंबळा प्रकल्पबाधीत येरड पूनर्वसीत गावठाणातील नागरी सुविधा कामे अद्यापही सुरु न झाल्याने सदर पुनर्वसीत गावात नागरी सुविधा पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व पूनर्वसीत गावठाणावरील नागरीकांनी प्रमुख मागण्यांसाठी कार्यकारी अभियंता बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना दिनांक २७ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर गावांना मुलभूत सोयीसुविधा व नियमीत पाणीपूरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) नाही.
बेंबळा प्रकल्पांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त १६ गावांचे २० ठिकाणी व अमरावती जिल्ह्यातील ८ गावांचे ८ ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले आहे. मौजे घुईखेड या गावातील एकूण १८ नागरी सुविधांपैकी १५ सुविधा पूर्ण झाल्या आहेत. तसेच मौजे येरड गावातील १८ पैकी १७ नागरी सुविधा पूर्ण आहेत. उर्वरीत सुविधांचे काम लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) होय.

(३) सदर गावठांणाकरीता मुळ नागरी सुविधांची कामे १० वर्षापूर्वी पूर्ण झाली असून ती दुरुस्तीस आली आहेत. अमरावती जिल्ह्यातील आठही गावांकरिता नागरीसुविधा दुरुस्ती प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे. त्या अंतर्गत नागरीसुविधा दुरुस्ती कामाच्या रु.३९४.६७ लक्ष एवढ्यारकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

उपरोक्त गावांतील पाणी पुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती, यांच्या मार्फत व इतर कामे विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांच्या मार्फत ठेव तत्वावर करण्याचे नियोजीत असून कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धोम बलकवडी (ता. वाई, जि. सातारा) प्रकल्पातंर्गत उजव्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत**

**(२२) ११९०८२ (२०-०७-२०१८) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोम बलकवडी (ता. वाई, जि. सातारा) प्रकल्पातंर्गत उजव्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक ६ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि धोम बलकवडी उजवा कालव्याचे अस्तरीकरणाचे काम प्रगतीत असून ते जून, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) या तालुक्यातील निरा देवघर प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी निधी उपलब्ध झाल्याने या प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करण्याबाबत**

**(२३) ११९०८४ (२०-०७-२०१८) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) या तालुक्यातील निरा देवघर प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी निधी उपलब्ध झाल्याने या प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांना दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच निरा देवघर धरणाच्या उजव्या कालव्याचे अस्तरीकरणाचे सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक २१ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उजव्या कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर धरणाच्या उजव्या कालव्याचे अस्तरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्यासह निरा देवघर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोरखेडी (ता.लोणार, जि.बुलढाणा) धरणातील अवैध पाणी उपसा बंद करण्याबाबत

**(२४) ११९५७९ (२५-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरखेडी (ता.लोणार, जि.बुलढाणा) धरणात अत्यंत कमी पाणीसाठा उपलब्ध असून पाण्याचा अवैधरित्या उपसा होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणातील अवैध पाणी उपसामुळे पाणी टंचाई निर्माण झाल्याने सदर पाणी उपसा बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) नाही.

प्रकल्पाच्या मृत साठ्यातील ०.७२ द.ल.घ.मी. पाणी पिण्यासाठी आणि गुराढोरांसाठी राखून ठेवण्यात आले होते. नोव्हेंबर २०१७ मध्ये अवैध उपसा निदर्शनास येताच तात्काळ प्रतिबंध घालून बंद करण्यात आला.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथील भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची देखभाल व दुरुस्तीअभावी झालेली दुरवस्था**

**(२५) १२०००७ (२०-०७-२०१८) श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) येथील भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची देखभाल व दुरुस्तीअभावी अनेक ठिकाणी पडझड झाली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा विभागाला कळवूनही विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी करुन आवश्यक ठिकाणी भराव्याची व दुरुस्तीची कामे प्रस्तावित केली असून कालव्यावरील देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ५० लक्ष तसेच सन २०१८-१९ या वर्षामध्ये कालव्याच्या दुरुस्ती करिता रु.३९८ लक्ष खर्चाच्या कामांचा समावेश असलेल्या प्रापण सूचीस महामंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा व पवनी (जि. भंडारा) येथील उपसा सिंचन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२६) १२०१८५ (२०-०७-२०१८) श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व पवनी (जि. भंडारा) येथील गोसेखुर्द प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील बेलाघाटा, गोसेखुर्द धरणावरील हत्तीडोई, उजव्या कालव्यावरील शेळी, शिवनाळा व आकोट तसेच धारगाव येथील टप्पा १ व टप्पा २ उपसा सिंचन प्रकल्पासाठी (lift irrigation) अर्थसंकल्प सन २०१८ - १९ मध्ये सदर प्रकल्पासाठी मुबलक निधी उपलब्ध करून तातडीने प्रकल्प पूर्णत्वास यावे व हजारो हेक्टर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी सिंचनाखाली याव्यात यासाठी

मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक २६ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार उपसा सिंचन प्रकल्पासाठी (lift irrigation) निधी उपलब्ध करून प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) :** (१) होय.
(२) हत्तीडोई,धारगांव टप्पा १ व टप्पा २ उपसा सिंचन योजनांना अद्याप प्रशासकीय मान्यता प्राप्त नाही. पवनी (बेलघाटा), शेळी, शिवनाळा व आकोट उपसा सिंचन योजना ह्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या भाग म्हणून राबविल्या जात आहेत.
प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात गोसेखुर्द प्रकल्पाच्या बांधकाम घटकासाठी रु.७०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तर प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतील हर खेत को पानी या कार्यक्रमांतर्गत रु.२८.५३ कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात ७७ लघु सिंचन प्रकल्पापैकी २९ प्रकल्पातील जलसाठा रिक्त झाल्याबाबत**

**(२७) १२०१९५ (२०-०७-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात गत हंगामात पुरेसा पाऊस न आल्यामुळे येथील ७७ लघु सिंचन प्रकल्पापैकी २९ प्रकल्पातील जलसाठा पूर्णत: रिक्त झाला असल्याचे दिनांक १५ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तीन उपसा सिंचन योजना व बारा बंधारे कोरडे पडले असल्याने ग्रामीण भागातील नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रब्बी हंगामातील शेती व पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) होय.
सन २०१७-१८ या वर्षात अत्यल्प पर्जन्यमान झाल्यामुळे दि.१३.११.२०१८ रोजीच्या पाणी आरक्षण समितीच्या बैठकीत वाशिम जिल्ह्यातील प्रकल्पाचा उपलब्ध पाणीसाठा पिण्याकरिता आरक्षित करण्यात आला होता. सबब सिंचनाकरिता कुठल्याही प्रकल्पातून पाणी दिले गेले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

अमरावती विभागामधील दिया, दुलघाट व सोनखेड हया 3 लघु उपसा सिंचन योजना शासन निर्णय क्र. १०८९/४५७/(१०५/८९) सिंव्य, दि. १५/६/१९९२ अन्वये बंद करण्यात आलेल्या आहेत.

तसेच या विभागाकडे १२ वसंत बंधारे व १ को.प.बंधारा असून १२ बंधारे गाळ साचल्याने अकार्यक्षम झालेले आहेत व वघाळझुंज को.प. बंधारा कार्यरत आहे. यामुळे या बंधाऱ्यांच्या लाभक्षेत्रातील नागरिकांची गैरसोय होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दि.११/९/२०१८ रोजी अमरावती जिल्हातील ५० लघु प्रकल्पामध्ये सुमारे ४७ टक्के पाणीसाठा आहे. ३ लघु प्रकल्पामध्ये १०० टक्के व ५ लघु प्रकल्पामध्ये सुमारे ३४ टक्के पाणीसाठा आहे. या प्रकल्पांपैकी मालखेड, पुसली व वाई या लघु प्रकल्पावरून पिण्याचा पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. पुसली लघु प्रकल्पामध्ये २५ टक्के व वाई लघु प्रकल्पामध्ये ६८ टक्के उपयुक्त साठा असून, मालखेड लघु प्रकल्पामध्ये उपयुक्त पाणी साठा ०.०० टक्के आहे. तसेच चांदी लघु प्रकल्पामधुन नांदगाव खंडेश्वर पाणी पुरवठा योजना कार्यान्वित असून, सदर प्रकल्प १०० टक्के भरला आहे. रब्बी हंगामतील शेती व पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा दि. १५/१०/२०१८ अखेर प्रकल्पामध्ये उपलब्ध होणा-या पाणी साठ्यावर करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावराजा (ता.चिखली,जि.बुलढाणा) मधील मेरा वितरिका क्र.२ अंत्री-कवठळ लघु पाटवरील जमिन संपादित झालेल्या क्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्तांचे नाव नोंदविण्याबाबत**

**(२८) १२०६२७ (२०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसंपादन प्रकरण क्र.६६/२०१२-१३ मौ.कवठळ (ता.चिखली,जि.बुलढाणा) खडकपूर्णा प्रकल्प विभाग देऊळगावराजा मधील मेरा वितरिका क्र.२ अंत्री-कवठळ लघु पाटवरील जमिन संपादित झालेल्या क्षेत्रामध्ये गट क्र.१७९ व १८० यामध्ये अनुक्रमे श्री. दत्त्ता विजय खेडेकर व श्री.दिलीप पुंडलिक खेडेकर यांच्या नावाची नोंद करण्याबाबत वि.अधिक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा यांना दिनांक १५ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) : (**१) होय.
(२) सदर निवेदनानुसार नायब तहसिलदार, चिखली व यंत्रणा यांनी स्थळ पाहणी करुन तसा अहवाल उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, बुलडाणा यांना सादर केला आहे.
(३) मोबदला वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील माणिकपुंज मध्यम प्रकल्पाचा द्वितीय सुप्रमाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत

**(२९) १२०७५१ (२०-०७-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग नाशिक या विभागाअंतर्गत असलेल्या नांदगांव तालुक्यातील माणिकपुंज मध्यम प्रकल्पाचा द्वितीय सुप्रमाचा प्रस्ताव दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास तापी पाटबंधारे महामंडळ जळगांव मार्फत शासनास (जलसंपदा विभागास) सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-१२-२०१८) :** (१) होय.
(२) उपरोक्त प्रस्तावावर शासनाने वेळोवळी उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता तापी पाटबंधारे विकास महामंडळामार्फत करण्यात आली असून, प्रस्ताव मंजूरीच्या अंमित टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विसापूर पुणदी (ता.तासगांव, जि.सांगली) योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(३०) १२१०११ (२३-०७-२०१८) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विसापूर पुणदी (ता.तासगांव, जि.सांगली) योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करुन योजना कायमस्वरुपी चालू ठेवण्याबाबत तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा मंत्री तसेच जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे मागील २ वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८) :** (१) होय.

(२) विसापूरच्या दोन्ही व पुणदीच्या तीनही टप्प्यांची स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत कामे पूर्ण झाली आहेत. विसापूर टप्पा-१ (अ) ची दि.२९.८.२०१४ व टप्पा -1(ब) ची दि.२६.०९.२०१४ रोजी यशस्वी चाचणी झाली आहे. पुणदी उपसा सिंचन योजनेची दि.१६.०८.२०१४ रोजी चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. विसापूर व पुणदी उपसा योजनेतील पंपगृहे, उर्ध्वगामी नलिका व गुरुत्व नलिकांची कामे पूर्ण झाली असून, लाभक्षेत्रास बंदिस्त पाईपलाईनव्दारे पाणी देण्यासाठी आवश्यक वितरण व्यवस्थेची कामे ८० टक्के पूर्ण झाली आहेत. उर्वरित वितरण व्यवस्थेची कामे लवकरच पूर्ण करण्यात येत आहेत. दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीवरुन योजना अंशत: कार्यान्वित करुन सन २०१४ पासून तालुक्यातील विविध लघु पाटबंधारे तलाव, पाझर तलाव व बंधारे भरून देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरगाव व अलकुड (एम) तसेच जामगव्हाण (ता.कवठेमहाकांळ, जि.सांगली) या गावांना पाईप लाईनद्वारे पाणी देण्याबाबत**

**(३१) १२१०१४ (२४-०७-२०१८) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव व अलकुड (एम) तसेच जामगव्हाण (ता.कवठेमहाकांळ, जि.सांगली) या गावांचा म्हैशाळ योजनेत समावेश करुन या गावांना पाईप लाईनद्वारे पाणी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा मंत्री तसेच स्थानिक पाणीपुरवठा कार्यालय, सांगली यांच्याकडे मागील १ वर्षापासून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीवर अद्यापी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त गावांना पाईप लाईनद्वारे पाणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८)** :(१) होय.

(२) हे खरे नाही.

बोरगांव व अलकुड (एम) या गावांचे हद्दीतील अनुक्रमे ५३४ हे. व २१० हे. क्षेत्र म्हैसाळ योजनेच्या लाभक्षेत्रात येते. तथापि जायगव्हाण या गावाचे क्षेत्र कालवा तळ पातळी तलांकाचे वर असल्याने सद्य:स्थितीत सदरचे क्षेत्र लाभक्षेत्रात येऊ शकत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील जलसेतूची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(३२) १२१०५२ (२०-०७-२०१८) श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले,जि.अहमदनगर) येथील जलसेतूची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे अकोले येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८) : (**१) होय.

(२) निळवंडे-२ धरणाचे बुडीत क्षेत्रातील राजुर पिंपरकणे रस्त्यासाठी प्रवरा नदीवरील उच्च तलांक पुलाचे काम प्रगतीत असून पुलाच्या एकूण कामाच्या ५४ टक्के काम पूर्ण झाले आहे. सदर पुलाच्या कामावर माहे जुलै- २०१८ अखेर रु. २१५१.८९ लक्ष खर्च झाला आहे.

म्हाळादेवी जलसेतू -उर्ध्व प्रवरा उजवा कालवा सा.क्र. ६७५ मी. प्रवरा नदीवरील जलसेतूचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. या कामावर माहे जुलै- २०१८ पर्यंत रु. १४२७.७५ लक्ष इतका खर्च झाला आहे.

उर्ध्व प्रवरा प्रकल्पासाठी सन २०१८-१९ मध्ये शासनाकडून रु. १५८.८३ कोटी अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच नाबार्ड मार्फत रु. ७५.७४ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील कृष्णा - मराठवाडा जलसिंचन प्रकल्पांतर्गत मराठवाड्याला लागणाऱ्या पाण्यासाठी केंद्र - राज्य शासन यांनी संयुक्तरित्या आर्थिक तरतूद करण्याबाबत

**(३३) १२११२१ (२०-०७-२०१८) ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृष्णा - मराठवाडा जलसिंचन प्रकल्पांतर्गत मराठवाड्याला लागणाऱ्या पाण्यासाठी केंद्र शासनाने अद्यापपर्यंत आर्थिक तरतूद केली नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य शासनाने उस्मानाबाद जिल्हाबरोबरच बीड जिल्हयातील अत्यंत महत्वाचा असलेला कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाची निधीअभावी कामे अपुरी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पांतर्गत मराठवाड्यासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी केंद्र - राज्य शासन यांनी संयुक्तरित्या आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८) :**(१) होय.

(२) सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षासाठी शासनाने कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांकरीता अनुक्रमे रु. १२५ व रु. १५० कोटी इतक्या निधीची तरतुद केली असुन, त्यानुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत बीड जिल्हयातील उपसा सिंचन योजना क्र. ३, आष्टी या योजनेचे काम दि. ३१/१२/२०१३ पासून पर्यावरण मान्यते अभावी बंद ठेवण्यात आल्यामुळे योजनेची कामे अपूर्ण आहेत. पर्यावरण मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) कृष्णा-मराठवाडा प्रकल्पास नाबार्ड अंतर्गत आर्थिक तरतुद प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने कृष्णा-मराठवाडा प्रकल्पास नाबार्ड अंतर्गत निधी मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्याची बाब क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्हयातील तावरजा प्रकल्पाच्या गेट व सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३४) १२१३६० (२०-०७-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील तावरजा प्रकल्पाच्या नादुरुस्त गेट व सांडवाच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी द्वार व विमोचके मंडळ, संकल्प चित्र मंडळ, नाशिक यांचा अहवाल व निरीक्षण टिप्पणी प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने तावरजा प्रकल्पाच्या नादुरुस्त गेट व सांडव्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) : (**१) अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांनी तावरजा मध्यम प्रकल्पाची दि.२४.०१.२०१८ रोजी क्षेत्रिय पहाणी केली असून क्षेत्रिय पहाणीची निरीक्षण टिप्पणी दि.२९.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाली आहे.
(२) अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांनी स्वंयचलित द्वारांच्या दुरुस्तीसाठी सुचविलेल्या कायमस्वरुपी व तात्पुरत्या उपाययोजना करण्याबाबतची कार्यवाही यांत्रिकी व स्थापत्य विभागांमार्फत क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील ब्रिज कम बॅरेजेसमध्ये प्रस्तावित कामांची मंजुरी प्रलंबित असल्याबाबत

**(३५) १२१३६४ (२०-०७-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गास जोडणाऱ्या रस्त्यावरील वा नदी नाल्यावरील आवश्यक पुलाचे बांधकाम व बॅरेजेसच्या बांधकामासाठी केंद्रशासनाच्या जलसंपदा विभागाकडून होणार असलेल्या ब्रिज कम बॅरेजेस मध्ये कन्वरर्जन करून पाणी अडवा या कामासाठी लातूर जिल्ह्याची पायलट जिल्हा म्हणून शासनाने निवड केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने सर्वेक्षण करून प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे काय व सदर कामास निधी मंजूर करण्यात आलेला आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक तालुकानिहाय किती कामांचे सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करण्यात आले असून तालुकानिहाय किती कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मालेगांव (जि.वाशिम) येथील मंजूर झालेल्या एक हजार विहिरीपैकी निम्म्या विहिरींचे काम पूर्ण झाले नसल्याने योजना अयशस्वी झाल्याबाबत**

**(३६) १२१५१३ (२३-०७-२०१८) श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) येथील मंजूर झालेल्या एक हजार विहिरीपैकी निम्म्या विहिरींचे काम पूर्ण झाले नसुन त्यामुळे ही योजना अयशस्वी ठरली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव तालुक्यात सन २०१५-१६ मध्ये शेतक-यांसाठी एक हजार सिंचन विहिरींचे उदिद्ष्ट देण्यात आले असुन या एक हजार विहिरीसाठी ४ हजारांच्यावर अर्ज आल्याने इश्वर चिठ्ठीतून विहिरीच्या लाभार्थ्याची निवड करण्यात येऊन निवड झालेल्या लाभार्थ्याना विशिष्ट मुदतीत विहिरीचे काम करण्याच्या सुचना देण्यात आल्या या एक हजार विहिरीचे काम करुन घेण्यासाठी पंचायत समिती, लघु पाटबंधारे बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम, सार्वजनिक बांधकाम आदि विभागाकडे विहीरी वाटून दिल्या परंतु सदर विहिरीचे काम करण्यात सर्व विभागाच्या अधिका-याने टाळाटाळ केल्याने शेतक-यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

पंचायत समिती, मालेगांव (जि.वाशिम) अंतर्गत मंजूर झालेल्या १००० विहिरींपैकी ३३७ सिंचन विहिरींची कामे पूर्ण झालेली असून ३३० सिंचन विहिरींची कामे प्रगतीपथावर आहे.

मालेगांव तालुक्यातील यंत्रणा यांच्यामार्फत ६० विहिरी देण्यात आल्या होत्या. त्यापैकी, १९ विहिरींची कामे पूर्ण झाली असून २२ सिंचन विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. तर उर्वरित १९ सिंचन विहिरींचे कामे अद्याप सुरु झालेली नाहीत. तर पंचायत समिती स्तरावरुन ९४० सिंचन विहिरी सुरु करण्यात आल्या असून त्यापैकी ३१८ विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत व ३०८ विहिरी प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सिंचन प्रकल्पात पाणी साठा वाढविण्याबाबत**

**(३७) १२१५७४ (२०-०७-२०१८) श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यासह औरंगाबाद जिल्हयात लघु व मध्यम प्रकल्प दरवर्षी फेब्रुवारी महिन्यातच कोरडे पडत असल्यामुळे पिण्यासाठी व सिंचनासाठी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सिंचन प्रकल्पात पाणी साठा वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औरंगाबाद जिल्हयातील पूर्ण झालेल्या मध्यम व ल.पा. प्रकल्पांची व्यवस्थापन यंत्रणेमार्फत मान्सून पूर्व व मान्सूनोत्तर पाहणी नियमीत पणे करण्यात येते. सिचंन प्रकल्पात पाणी साठा वाढविण्या करिता प्रकल्पातून गाळ काढण्याची कामे लोकसहभागातून करण्यात येतात. तथापि पाणलोटक्षेत्रात पुरेसे पर्जन्यमान झाले तर पाणीसाठा उपलब्ध होऊ शकेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवरगांव, संग्रामपूर व बोरी, शिवनी भोंडकी येथील ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३८) १२१७४१ (२३-०७-२०१८) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवरगांव (जि.चंद्रपूर) संग्रामपूर (जि.बुलढाणा) व बोरी (जि.चंद्रपूर), शिवनी (जि.हिंगोली) , भोंडकी (जि.भंडारा) येथील ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-११-२०१८) :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) व (३) भोंडकी (जि.भंडारा) येथे गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर तक्रारीबाबत चौकशी करण्यात आली. चौकशीअंती गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी उमरेड जवळील प्रस्तावित दोन औष्णिक वीज प्रकल्पांना देण्याचा घेतलेला निर्णय**

**(३९) १२२१२३ (२०-०७-२०१८) श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी उमरेड जवळील प्रस्तावित दोन औष्णिक वीज प्रकल्पांना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला पाणी देण्यास नागरिकांचा विरोध असल्याने शासन सदर निर्णय रद्द करणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशीम जिल्ह्यात मनरेगा योजनेमध्ये ६००० विहिरींना शासनाने १८ महिन्यांपूर्वी मान्यता दिल्याबाबत**

**(४०) १२२१७८ (२३-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्ह्यात मनरेगा योजनेमध्ये ६००० विहिरींना प्रशासनाने १८ महिन्यांपूर्वी मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे वेगवेगळया विभागांना विभागून देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागांनी सदर कामे तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयकुमार रावल (२९-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

एकूण ६००० सिंचन विहिरींपैकी ३६७ सिंचन विहिरी यंत्रणांना विभागून दिलेल्या आहेत. तर, उर्वरित ५६३३ सिंचन विहिरी पंचायत समिती यांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) एकूण ६००० सिंचन विहिरींपैकी १८०६ सिंचन विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच, २९९५ सिंचन विहिरींची कामे प्रगती पथावर असून ११९९ सिंचन विहिरींची कामे सुरु होणे बाकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा खोऱ्यातील २३ टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळण्याबाबत**

**(४१) १२२२४७ (२०-०७-२०१८) श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती दूर करण्यासाठी तसेच कृष्णा खोऱ्यातील हक्काचे २३ टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळावे म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून मराठवाड्यातील जनतेने आंदोलने, मोर्चा, लेखी निवेदने व संबंधीत मंत्र्यांच्या भेटी इत्यादी मार्गाचा अवलंब करुन तीव्र आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सन २०१७ कृष्णा-मराठवाडा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृष्णा-मराठवाडा प्रकल्पामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील २५ हजार हेक्टर व बीड जिल्ह्यातील ८ हजारपेक्षा जास्त कोरडवाहू जमिन सिंचनाखाली येणार असून या दोन्ही जिल्ह्यातील ९ तालुक्यातील २८८ गावांना त्याचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकल्पाला गोसी खुर्दप्रमाणे विशेष प्रकल्पाचा दर्जा देवून उक्त प्रकल्पाचे काम प्राधान्याने हाती घेवून ते विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५१७ (३३)

**श्री. गिरीष महाजन (२६-११-२०१८) :**(१) होय.

(२) व (३) शासनाने दि. ०७/०७/२००९ च्या पत्रान्वये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या २३.६६ अ.घ.फू. पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता दिली आहे. त्या प्रमाणे प्रकल्पाचे रू. ४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास

दि. २७/८/२००९ अन्वये शासनाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करावयाचे असून प्रथम टप्पा ७ अ.घ.फू. पाणी वापरासाठी व व्दितीय टप्पा १६.६६ अ.घ.फू. पाणी वापरासाठी प्रस्तावित आहे. प्रथम टप्पा पाणी वापराची उर्वरित किंमत रू. ४८१७ कोटी आहे. या प्रकल्पामुळे उस्मानाबाद जिल्हयातील ८७१८८ हेक्टर व बीड जिल्हयातील २७५४३ हेक्टर जमिन सिंचनाखाली येणार असून या दोन्ही जिल्हयातील ९ तालुक्यातील २८८ गावांना त्याचा फायदा होणार आहे. तथापि या प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात उपलब्ध झालेल्या ७ अ.घ.फु. पाण्यातून उस्मानाबाद जिल्हयातील २५७९४ हेक्टर व बीड जिल्हयातील ८१४७ हेक्टर जमिन सिंचनाखाली येणार आहे.

सदर कामे ४ वर्षाच्या कालबध्द मर्यादेत पूर्ण करता यावीत या उद्देशाने कामासाठी लागणारा निधी हा मा. राज्यपाल महोदयांच्या निधी वाटपाचे सूत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा. राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये झालेला आहे. त्यानुसार दिनांक २५ ऑक्टोबर २०१६ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी उपरोक्त निधी मा. राज्यपाल महोदयांचे निधी वाटप सूत्राच्या निर्देशाबाहेर ठेवण्याबाबत विनंती केलेली आहे.

(४) या प्रकल्पाचे काम करण्यासाठी उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद , अंतर्गत २ विभाग व औरंगाबाद पाटबंधारे मंडळातर्गत १ विभाग कार्यरत आहे व सध्या सदर आस्थापना पुरेशी आहे. मा. राज्यपाल महोदयांनी सन २०१७-१८ मधील कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठीचा निधी निर्देशाबाहेर ठेवण्यास मान्यता दिली आहे. सन २०१८-१९ मध्ये कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासाठी रु. १५० कोटीचा निधी मंजूर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील डहाणू-नाशिक राज्यमार्गावर सारणी येथे सूर्या उजवा तीर कालव्याच्या मुख्य कालवा (सारणी ) साखळीची झालेली दुरवस्था

**(४२) १२२६३१ (२४-०७-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील डहाणू -नाशिक राज्यमार्गावर सारणी येथे सूर्या उजवा तीर कालव्याच्या मुख्य कालवा (सारणी) साखळी क्र. ११/३७५ जीर्ण झाल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी,२०१८ मध्ये निदर्शनास येऊनही सदर पुलाची अदयापी दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलावरुन सुमारे ६० हून अधिक गावांची वाहतूक होत असून रिलायन्स औष्णिक प्रकल्प आणि प्रकल्पाकडे ओवरलोड वाहनांची दिवसरात्र वाहतूक सुरु असून उक्त पुलाला ४० वर्षे जुना असून पुलाचा स्लॅब झिजला आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार उक्त पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८) : (**१) पालघर जिल्हयातील डहाणू-नाशिक राज्यमार्गावर सूर्या प्रकल्पांतर्गत उजव्या तीर कालव्याच्या सा.क्र.११/३७५ मी.(सारणी) वरील डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील सुमारे ३० ते ३५ वर्षे जुन्या पूलाच्या पृष्ठ लादीच्या दोन्ही कडेवरील लोह सळ्यांवरचे संधानकाचे आच्छादन निखळल्यामुळे दोन्ही बाजूच्या लोहसळ्या उघड्या पडल्या आहेत.
सदर पुलाची प्राथमिक तपासणी केली असता पुलाची दुरूस्तीची कामे करण्याचे आवश्यक असल्याचे आढळून आले आहे.
(२) सूर्या प्रकल्पांतर्गत कालव्यांवरील सदर पूल ३० ते ३५ वर्षे जूना आहे. पृष्ठ लादीच्या प्राथमिक पाहणी अंती सदर पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.
तथापि, पूल वाहतूकीस धोकादायक झालेला नसून पृष्ठ लादीच्या दोन्ही कडेवरील लोहसळ्यांवरचे संधानकाचे आच्छादन निखळल्यामुळे दोन्ही कडेकडील लोहसळ्या उघड्या पडल्या आहेत. स्लॅब झिजलेला नाही.
(३) सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात सूर्या उजवा तीर व डाव्या तीर कालव्यांच्या बांधकामांची दुरूस्ती करण्याची कामे प्रस्तावित करण्यांत आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हयातील सुर्या धरणाच्या कालव्यांमध्ये साठलेला गाळ काढण्याबाबत

**(४३) १२२६३७ (२०-०७-२०१८) श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील गांवाना उन्हाळ शेतीला पाणी पुरविणा-या सूर्या धरणाच्या कालव्यांमध्ये साठलेल्या गाळ व कच-यामुळे कालव्याला कचराकुंडीचे स्वरुप प्राप्त झाल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील सुमारे १०० गावातील शेतीला सुर्या कालव्यातून पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,सुर्या धरणाच्या कालव्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व तदनुसार सुर्या धरणाच्या कालव्यांतील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
कोंकण सिंचन हंगाम २०१७-१८ च्या अनुषंगाने यांत्रिकी विभागामार्फत कालवा स्वच्छतेची कामे करण्यांत येवून डिसेंबर-२०१७ ते मे-२०१८ या कालावधीत सिंचनाची आवर्तने सुरळीतपणे पार पाडण्यांत आलेली आहेत.
(२) सूर्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील एकूण ११० गावांपैकी सूर्या उजवा तीर कालव्यातून ४३ व डावा तीर कालव्यातून ६ अशा एकूण ४९ गावांना कोंकण सिंचन हंगामा दरम्यान सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून दिले जाते.
(३) प्रत्येक वर्षी सिंचन हंगामाच्या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांद्वारे कालव्यांची पाहणी करण्यांत येते व आवश्यकतेनुसार यांत्रिकी संघटनेमार्फत उपलब्ध यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने कालव्यांतील गाळ काढण्यांत आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील हतनुर प्रकल्पाची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(४४) १२३४८६ (२०-०७-२०१८) श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील हतनुर प्रकल्पाच्या कालव्यावरील कामे महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत प्रस्तावित होती परंतु प्रकल्पाची मुदत संपल्यामुळे ही कामे पूर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपूर्ण कामामुळे चारीच्या शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचू शकत नसल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पांवरील विशेष दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देऊन अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार या प्रकल्पावरील विशेष दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय

(४) सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात कालवा स्वच्छता मोहिमेअंतर्गत हतनुर कालवा कि. मी. १ ते ९२ आणि त्यावरील पाणी वापर संस्था यांचे दुरुस्तीचे काम पाखरण कार्यक्रमांतर्गत अंतर्भूत करण्यात आलेले आहे व त्यानुसार यांत्रिकी विभागामार्फत सद्यस्थितीत हतनुर कालव्यावर मातीकामाच्या दुरुस्तीची कामे सुरु आहेत.

तसेच सन २०१८-१९ या वर्षात पाखरण कार्यक्रमात कालवा स्वच्छता मोहिमे अंतर्गत यांत्रिकी विभागामार्फत कालवा दुरुस्तीची कामे प्रस्तावित केलेली आहे. हतनूर प्रकल्पावरील विशेष दुरुस्तीच्या कामांची शेरे पुर्तता करून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील कुंड खुर्द गावातील रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४५) १२३५०० (२४-०७-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात असलेल्या कुंड खुर्द गावाच्या नागरीकांना जून,२०१८ पर्यंत घर खाली करण्याच्या सूचना प्रकल्प बांधकाम विभागाकडून देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ मध्ये ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार रस्त्यांची कामे झाल्याशिवाय घर खाली करण्यात येणार नाही असा इशारा कुंड खुर्द गावातील नागरीकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निम्न पेढी प्रकल्पामुळे ज्या ६ गावांतील खराब रस्ते दुरुस्त करण्यासाठी निधी मंजूर करुन उक्त रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-११-२०१८) :** (१) होय.

(२) या ठरावामध्ये बुडीत क्षेत्राबाहेरील शिल्लक राहात असलेल्या शेतीसाठी वहीवाटरस्ते तसेच पुनर्वसन गावठाणासाठी अमरावती-परतवाडा मुख्य रस्त्यापासून अतिरिक्त पोच रस्त्याची मागणी आहे.

(३) या ठरावामध्ये 6 गावातील खराब रस्ते दुरुस्तीबाबत उल्लेख नाही. उपरोक्त दोन रस्त्यांच्या (चेचरवाडी ते भातकुली जोडरस्ता व धामोरी ते चेचरवाडी जोडरस्ता) मागणीपैकी वहीवाटीच्या रस्त्यांचे अंदाजपत्रक विभागीय कार्यलयाचे पत्र क्र. ३७६५/ तांशा क्र. १, दि.०२/०८/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यतेकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले आहे.

तहसीलदार, अमरावती, यांनी पत्र क्र. मग्रारोहयो ३८५, दि. २३/०८/२०१८ अन्वये जिल्हा परीषद बांधकाम उपविभाग क्र.१, अमरावती, यांना अमरावती परतवाडा मुख्य रस्त्यापासूनचा पादंण रस्ता कृती आराखड्यात समाविष्ट करुन घेण्याकरिता सूचित केले आहे.
त्याप्रमाणे या रस्त्यावर येणा-या पुलाच्या बांधकामाचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाचे मान्यतेस्तव सादर करण्याच्या प्रक्रियेत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लघु पाटबंधारे तलाव, चिचपाणी (ता.चोपडा, जि.जळगांव) या धरणाच्या नाल्यावर खालील बाजूस ठिकठिकाणी साखळी पध्दतीने भूमिगत बंधा-याचे काम करण्याबाबत**

**(४६) १२३८०३ (२४-०७-२०१८) श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघु पाटबंधारे तलाव, चिचपाणी (ता.चोपडा, जि.जळगांव) या धरणाच्या खालील बाजूस रेताळ भु-स्तराचा विचार करता कालव्याव्दारे पूर्णपणे पाणी वाया जाऊन शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळणार नसल्याने धरणाच्या नाल्यावर खालील बाजूस ठिकठिकाणी साखळी पध्दतीने भूमिगत बंधा-याचे काम करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-११-२०१८) :**(१) होय,
(२) मा. आमदार महोदयांच्या मागणीनुसार सर्वेक्षण, अन्वेषण व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान डाव्या कालव्यातील गळती थांबविण्याबाबत**

**(४७) १२३८४७ (२०-०७-२०१८) श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान डाव्या कालव्यातील उन्हाळी पिकांसाठी दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी सोडलेल्या पाण्याच्या कालव्यातील गाळ दगड धोंडे साठल्याने फुगवटा निर्माण होऊन भाबुरवाडी (गवारी वस्ती (ता.खेड, जि.पुणे) येथे कालव्याचा भराव वाहुन गेल्याने कालवा फुटण्याची तक्रार ग्रामस्थानी केली आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच चासकमान कालव्यात अनेक ठिकाणी कालव्याची गळती होत असुन अस्तरीकरणाचे काम अनेक वर्षापासुन प्रलंबित आहे व या गळतीमुळे चासकमान धरणातुन डाव्या कालव्याला ५५० क्युसेकने सोडलेले पाणी टेल भागात १०० क्युसेकने पोहचते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार चासकमान डाव्या कालव्यातील मोठी गळती थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) : (**१) हे खरे नाही. तथापि दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात दि. २२.३.२०१८ रोजी चासकमान डाव्या कालव्यातून सोडलेल्या पाण्याच्या कालव्यातील गाळ, दगड धोंडे साठल्याने भराव वाहून गेला अशा आशयाची फक्त बातमी दि.५.४.२०१८ मध्ये प्रसिध्द झाली होती. परंतू प्रत्यक्षात कालवा भराव वाहून गेलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे.तसेच कोणत्याही शेतकरी/ग्रामस्थांची याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) चासकमान डाव्या कालव्याचे संकल्पन अस्तरीकरणासह आहे. कालव्याची वहनक्षमता ९३० क्सुसेक्स इतकी आहे. सद्य:स्थितीत सलग अस्तरीकरणा अभावी ५५० क्युसेक्स पेक्षा जास्त विसर्गाने पाणी सोडता येत नाही.

(३) डाव्या कालव्याच्या ६७ कि.मी. लांबीपैकी १६ कि.मी. लांबीमधील अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. अद्याप ५१ कि.मी. लांबीचे अस्तरीकरणाचे काम निधीअभावी पूर्ण होऊ शकलेले नाही. कालव्याचे अस्तरीकरण करण्यासाठीची तरतूद तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव करण्यात आली असून त्यास मान्यता घेणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृष्णाखोरे महामंडळाच्या जमिनींना सीमा भिंत बांधण्यासह जागा अतिक्रमण मुक्त करण्याबाबत

**(४८) १२३९०४ (२४-०७-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णाखोरे महामंडळाअंतर्गत पुणे येथील पाटबंधारे खात्याच्या जुन्या मोठा उजवा कालवा मोठा डावा कालवा , नवीन पुणे उजवा कालवा या कालव्यांसाठी संपादित (ब्रिटिशांच्या कालावधीतील भूसंपादन झालेल्या) जमिनींची पाटबंधारे व महसूल खात्याने पाटबंधारे खात्याच्या नावानं न केल्याने या कालव्यांसाठी संपादित केलेल्या जमिनीमधील त्रुटींचा फायदा घेऊन पाटबंधारे खात्याच्या जमिनी मूळमालक त्या जमिनीवर सात बारा आणून त्याची विक्री अथवा ताबा प्रस्थापित करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हडपसर येथील सर्वे नं.१८०,८१,८२ मधील १५४ एकर जमिन सुभाष सामुदायिक संघ या संस्थेस भाडेपट्टयाने दिलेली होती व त्याची मुदत दिनांक ३१ मार्च,२०१५ रोजी संपलेली असतनाना अद्याप सदर क्षेत्र पाटबंधारे विभागाने ताब्यात घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागातील काही तत्कालीन शाखा अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने जमीन मालकांच्या नावावर करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे तसेच महामंडळाच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचा भाडेपट्टा कालावधी संपून त्याचा व्यावसायिक वापर करण्यात येवूनही कोट्यवधी रुपये कमी आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंपदा विभागाच्या पुणे शहरातील मोकळ्या जमीनीवर विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिक्रमण होऊन हॉटेल, गोदाम, गॅरेज व व्यावसायिक कारणासाठी मोठ्या प्रमाणावर संरक्षण व प्रोत्साहन देत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी मा.मंत्री यांना पत्र देऊन कार्यवाही करण्याबाबत सूचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर जमिनींवर पाटबंधारे खात्याची नोंद करणे, सदर जागेची विक्री व परस्पर हस्तांतरणास नियंत्रण ठेवणे, तसेच महामंडळाच्या कोट्यवधी रुपयाच्या जमिनींना सीमा भिंत बांधण्याची जागा अतिक्रमण मुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२८-११-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय,

(३) महामंडळाने भाडेपट्टा करारनाम्याव्दारे दिलेल्या जमीनी काहींनी करारनामा संपल्यानंतर परत महामंडळास दिलेल्या आहेत व ज्या व्यक्ती /संस्थांनी जमीनी परत दिलेल्या नाहीत त्यांना भाडेपट्टयांची थकीत रक्कम भरण्यासाठी व जमिन ताब्यात देण्यासाठी नोटीसी पाठवल्या आहेत.

(४) होय,

(५) खडकवासला पाटबंधारे विभाग अंतर्गत मालमत्ता व्यवस्थापन उपविभागाची स्थापना केली असून सदर जमीनीवर पाटबंधारे खात्याची नोंद घेणे, जागेची विक्री व परस्पर हस्तांतरास नियंत्रण ठेवणे, अतिक्रमण मुक्त करणे, सीमा भिंत बांधणे, इ. कामे नियमितपणे करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोहा ( जि.रायगड ) तालुक्यातील कोलाड येथील नाना-नानी पार्कची झालेली दुरवस्था**

**(४९) १२४०३७ (२०-०७-२०१८) श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कोलाड येथे तत्कालिन जलसंपदा मंत्री यांच्या संकल्पनेतून रायगड पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून वयोवृध्दांसाठी साकारलेल्या नाना-नानी पार्कची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार सदर नाना-नानी पार्कची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-१२-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड मार्फत वार्षिक देखभाल करण्यात येते.

(३) व (४) नाना-नानी पार्कचे बांधकाम सन २०१४ मध्ये पुर्ण झाले त्यानंतर पुढील सलग ३ वर्ष पार्कची देखभाल व दुरुस्ती संबधित ठेकेदारांकडून पार पाडण्यात आली. रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड कार्यालया मार्फत सन २०१६-१७ मध्ये गवत/झाडे-झुडपे काढून नाना-नानी पार्क सुस्थितीत ठेवण्यात आले आहे.

---

**पुणे शहरातील टेमघर धरणाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५०) १२६३७३ (२४-०७-२०१८) प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला साखळी प्रकल्पातील टेमघर धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत असल्याचे बाब माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,त्यानुसार टेमघर धरणाचे दुरुस्तीचे काम गेल्यावर्षी पासून हाती घेण्यात येवून सुद्धा अद्यापही दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर कामास विलंब करणाऱ्या संबधित अधिकारी व कंत्राटदारावर करावाई करण्यासह टेमघर धरणाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१८)** : (१) टेमघर धरणातून विर्निदिष्ट प्रमाणापेक्षा जास्त जास्त गळती होत असल्याचे जून,२००७ पासून निदर्शनास आले आहे.

(२) व (३) टेमघर धरण दुरुस्तीचे काम शिवा स्ट्रक्चर्स प्रा. लि. व पायोनिअर फाऊंडेशन प्रा. लि. (संयुक्त अभियान) या ठेकेदारांस देण्यात आले आहे. ठेकेदाराने सदरचे काम दि.२८/०२/२०१७ पासून सुरु केले आहे. सदर कामाचा निविदा कालावधी २ वर्षे असून फेब्रुवारी,२०१९ पर्यंत काम पूर्ण करणे अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत धरण दुरुस्तीचे काम सकाळी ८ ते रात्री १० दोन टप्प्यांमध्ये करण्यात येत आहे. तसेच जून ते ऑक्टोबर या महिन्यांमध्ये पावसाळयामुळे काम बंद ठेवण्यात येते. तसेच सदरहू काम निविदा तरतुदीनुसार विहित कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

निविदा कालावधी पूर्ण न झाल्याने सध्या चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.